# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ६२

## (सभावृत्तांत)

दिनांक – ०९/०५/२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक ०९/०५/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड - सभापती
२. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३. मा.राजू मिसाळ
४. मा.अमित राजेंद्र गावडे
५. मा.आंगोळकर सागर सुनिल
६. मा.करुणा शेखर चिंचवडे
७. मा.लोंढे नम्रता योगेश
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
९. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
१०. मा.लांडगे सारिका संतोष
११. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१२. मा.बारणे अर्चना तानाजी
१३. मा.साधना अंकुश मळेकर

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.गावडे-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.पाटील मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.बोदडे,मा.खोराटे, मा.खोत,मा.झगडे,मा.राऊत,मा.चितळे,मा.कापडणीस-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.मुंढे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे,मा.कांबळे, मा.ओंभासे,मा.पुजारी,मा.गायकवाड, मा.मोरे,मा.पाटील-कार्यकारी अभियंता,मा.डॉ.दगडे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप-कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –</u>**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ९) | बोपखेल येथे मुळा नदीवर पूल बांधणेबाबत... |
| विषय क्रमांक १०) | निगडी से.क्र.२३ येथे १०० द.ल.ली. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र बांधणे या कामाकरीता नवीन लेखाशिर्ष निर्माण करणे व अंदाजपत्रकीय तरतुद वर्गीकरणाबाबत... |
| विषय क्रमांक ११) | पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी सार्वजनिक वाहनतळ धोरणास मान्यता मिळणेबाबत... |
| विषय क्रमांक १२) | पिंपरी चिंचवड शहरातील पाणी नमुने त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करुन घेणेबाबत... |
| विषय क्रमांक १३) | मनपाच्या उद्यान विभागाकडील उद्याने तसेच प्राथमिक/माध्यमिक शाळेमधील खेळणी दुरुस्ती व देखभाल कामाबाबत... |
| विषय क्रमांक १४) | पिंपरी गावातील यशवंतराव चव्हाण व्यापार संकुलातील कँटीन गाळ्याबाबत – मा.विकास डोळस, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक १५) | घरोघरचा कचरा गोळा करणे व मोशी कचरा डेपो पर्यंत वाहतूक करणेबाबत |
| विषय क्रमांक १६) | शहरातील विविध नाले सफाईचे टेंडर न काढणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक १७) | महानगरपालिकेच्या विविध खात्यांमार्फत करण्यात येणा-या रस्ता खोदाईसाठी अंतर्गत धोरण निश्चित करणेबाबत – मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक १८) | महापालिकेव्यतिरिक्त इतर संस्थामार्फत करण्यात येणा-या रस्ता खोदाईसाठी धोरण निश्चित करणेबाबत - मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव... |
| विषय क्रमांक १९) | इ प्रभागातील भोसरी, इंद्रायणीनगर, पांजरपोळ, टाक्यांवरुन पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणेबाबत... |
| विषय क्रमांक २०) | इ प्रभागातील मोशी, च-होली, दिघी टाक्यांवरुन पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणेबाबत... |
| विषय क्रमांक २१) | शेवाळेवाडी ग्रामपंचायतीस टँकरने पाणीपुरवठा करणेसाठी दर मंजुर करणेबाबत... |

--------

दिनांक ०२/०५/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६१) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक -२६२९ विषय क्रमांक - १

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग-ड क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.डक्षे/स्था/कावि/७०१/२०१८ दि.२४/४/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपळे गुरव प्रभाग क्र.५७ येथील दापोडी पुल ते तुळजाभवानी मंदिर ते सृष्टी चौकापर्यंतचा १८.०० मी रूंद रस्त्यांचे अद्यावत पध्दतीने नुतनीकरण करणेकामी महानगरपालिका सल्लागार पॅनलवरील **मे.पेव्हटेक कंन्सल्टंट** यांची या कामासाठी सल्लागार म्हणुन नेमणूक करणेस व महानगरपालिकेच्या प्रचलित दरानुसार व महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमांनुसार कन्सल्टिंग फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३० विषय क्रमांक - २

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- शिक्षण मंडळ

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.शिमं/९/कावि/७०/२०१८ दि.२६/४/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडील प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांसाठी बायोमॅट्रीक मशिन खरेदी व देखभाल दुरूस्तीबाबत या कामासाठी माहे मे २०१७ ते ऑक्टोंबर २०१७ अखेर र.रु.६,६३,०९६/- इतका खर्च झाला असून या झालेल्या खर्चास कार्योत्तर व माहे नोव्हेंबर २०१७ ते मे २०१८ अखेर अंदाजे र.रु.३,६३,०००/- इतका खर्च असे एकूण र.रु.१०,२६,०९६/- (अक्षरी र.रू.दहा लाख सव्वीस हजार शहाण्णव फक्त) खर्च होणार आहे. तरी याकामासाठी होणा-या एकूण खर्चास पुर्वीच्या निविदेच्या मंजूर दरात दोन ऐवजी तीन कर्मचारी मानधनावर नेमणेत येऊन मे.वरदविनायक इंजिनिअर्स सदरचे कामकाज करणेस तयार असलेने या थेट पध्दतीने कामकाज देणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३१ विषय क्रमांक - ३

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- ग क्षेत्रिय आरोग्य कार्यालय

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.करुणा चिंचवडे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.गक्षेका/आ/३/कावि/२४३/२०१८ दि.२६/४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.आयुक्त सो, यांचेकडील आदेश क्र.प्रशा २/कावि/४६०/२०१७ दि.०७/०८/२०१७ अन्वये प्रभाग समित्यांची पुर्नरचना झालेली आहे. त्यानुसार नविन प्रभाग रचनेनुसार ग क्षेत्रीय

कार्यालयाची दि.०९/०८/२०१७ रोजी अस्तित्वात आले आहे. त्यानुसार ‘ब’ क्षेत्रीय कार्यालयातील जुने प्रभाग क्र.४९, ५०, ५१ यांचे वर्गीकरण “ग” क्षेत्रीय कार्यालयामधील नविन प्र.क्र.३ व २४ यामध्ये त्यांचा समावेश झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग क्षेत्रीय आरोग्य कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ मधील दैनंदिन घरोघरचा कचरा, कुंड्यामधील कचरा, सार्वजनिक ठिकाणी साठणारा कचरा, गटर्सच्या कडेचे कचरा ढिग, मोकळ्या जागेतील कचरा ढिग दैनंदिन उचलुन महानगरपालिकेच्या मोशी कचरा डेपो येथे टाकणेच्या कामासाठी ‘ब’ क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील ठेकेदार मे जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगाव, पिंपरी यांना प्रति दिन प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.५,१३०/- व भोसरी कचरा स्थाणांतरण केंद्र येथे कचरा खाली करण्यासाठी प्रति दिन प्रति वाहन दोन खेपांसाठी र.रु.४,९००/- या दराने आदेश क्र.बक्षेआ/५/कावि/१००७/१६ दि.३१/१२/२०१६ नुसार देण्यात आलेले आहे. तरी ‘ब’ क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील मे जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगाव, पिंपरी यांच्या आदेशाची मुदत दि.३१/१२/१७ रोजी संपुष्टात आलेली होती. तरी सदर कामकाजास, ‘ब’ क्षेत्रिय आरोग्य कार्यालयाकडील पत्र क्र.

१) बक्षेआ/५/कावि/८१०/२०१७ दि.०८/१२/२०१७ व

२) बक्षेआ/५/कावि/८३२/२०१७ दि. १६/१२/२०१७ नुसार कचरा उचलणे व वाहतुक करणेसाठी मे जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरीगाव, पिंपरी यांना ग क्षेत्रीय कार्यालयामार्फत कामकाजाची मुदतवाढ देण्यात यावी व ग क्षेत्रीय कार्यालयाकडे “कचरा उचलणे व वाहतुक करणे” या लेखाशिर्षावर तरतुद नसल्याने, सदर कामाचे होणा-या बिलाची तरतुद ‘ब’ क्षेत्रीय कार्यालयामार्फत टाकणेत यावी असे कळविलेले होते. त्यानुसार ग क्षेत्रीय कार्यालयामार्फत मुदतवाढ घेण्यात आलेली होती, सदरची कामकाजाची मुदत दि.३१/०३/२०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. दि.०९/०८/२०१७ रोजी पासुन ६ क्षेत्रीय कार्यालया ऐवजी ०८ क्षेत्रीय कार्यालयाची निर्मिती झाल्याने ब क्षेत्रीय कार्यालयाकडील ०३ ट्रक/टिपर वाहने व ड क्षेत्रीय कार्यालयाकडील ०४ ट्रक/टिपर वाहने असे एकुण ०७ वाहने मे.जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरी यांच्यामार्फत पुरविण्यात आलेले आहे. तथापि कचरा उचलणे व वाहतुक करणे कामकाज हे अत्यावश्यक सेवेचे असून, मे जय गणेश एंटरप्रायजेस, पिंपरी यांना या कामासाठी टिपर ट्रक ७.५ मे.टन क्षमता असणारे प्रति दिन, प्रति वाहनावर दोन खेपांसाठी एक वाहन चालक + चार मजूर + इंधनासह एकुण ०७ वाहने भाडे तत्वावर पुरविण्यासाठी दि.०१/०४/२०१८ ते ३०/०६/२०१८ अखेर अथवा नविन निविदा कार्यवाही पूर्ण होईपर्यंत, यापैकी प्रथम येणा-या कालावधी पर्यंतच्या कामकाजास मुदतवाढ देणेस तसेच सदर कामाचे अपेक्षीत अंदाजीत खर्च र.रु.३३,५०,०००/- (अक्षरी र.रू.तेहतीस लाख पन्नास हजार फक्त) या येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३२ विषय क्रमांक - ४
दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- पाणीपुरवठा
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१३०३/२०१८ दि.०२/०५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.२९/१/२०१७-१८ अन्वये अशुद्ध जलउपसा केंद्र रावेत येथील टप्पा क्र.3 व ४ योजने अंतर्गत क्षमता वाढविणेसाठी स्टॅण्डबाय पंपसेट बसविणे व आनुषंगिक कामे करणेकामी मे.एक्सेल इलेक्ट्रिकल्स निविदा रक्कम रू.४,५८,०३,८७२/- (अक्षरी र.रू.चार कोटी अठ्ठावन्न लाख तीन हजार आठशे बाहत्तर फक्त) पेक्षा २५.५६% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३,४०,९६,४०२/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३३ विषय क्रमांक - ५
दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- आपत्ती व्यवस्थापन
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.अर्चना बारणे
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आप.व्य/०१/कावि/११०/२०१८ दि.४/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आस्थापनेवरील आपत्ती व्यवस्थापन विभागाकरीता आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदनामाचे 1 पद भरणेकरीता जाहिरात क्र.1062 दिनांक 06/01/2018 अन्वये जाहिरात प्रसिध्द करून अर्ज मागविणेत आले होते. त्यानुसार 16 उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी 01 उमेदवारांचा अर्ज पात्र झाला आहे. प्राप्त 16 उमेदवारांचे अर्जापैकी फक्त श्री.ओमप्रकाश किसनराव बहिवाल या उमेदवाराचा अर्ज पात्र होत असल्याने मुलाखतीस न बोलवता थेट नेमणुक देणेकामी मान्यता देणेत आलेली आहे. श्री.ओमप्रकाश किसनराव बहिवाल यांना आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन विभाग या पदावर तात्पुरत्या स्वरूपात प्रतिमहा एकत्रित मानधन र.रू.40,000/- फक्त प्रमाणे आदेशाच्या तारखेपासुन 6 महिने कालावधीकरीता तात्पुरती नेमणूक देणे आवश्यक आहे. श्री.ओमप्रकाश किसनराव बहिवाल यांना आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन या पदावर तात्पुरत्या स्वरूपात 6 महिने कालावधीसाठी प्रतिमहा एकत्रित मानधन र.रू.40,000/- फक्त प्रमाणे देणेत येणा-या नेमणुकीस व त्याकामी येणारा प्रत्यक्ष खर्च रक्कम रूपये 2,40,000/- (अक्षरी र.रू. दोन लाख चाळीस हजार फक्त) (प्रतिमहा 40,000/- प्रमाणे 6 महिने) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३४ विषय क्रमांक - ६
दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- लेखा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/१अ/कावि/४४५/२०१८ दि.४/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये विविध विभागांच्या कार्यालयीन कामकाजासाठी विभागप्रमुखांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांना यापूर्वी वेळोवेळी वित्तीय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. परंतु दिवसेंदिवस महापालिकेचा कामाचा वाढता व्याप व वाढत जाणा-या वस्तूंच्या किंमती विचारणा घेता कामकाज कार्यक्षमतेने जलद गतीने पार पाडण्यासाठी वित्तीय अधिकारात वाढ करून विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांना प्रदान करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६९ चे तरतुदीनुसार विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांना वित्तीय अधिकार प्रदान करणे आवश्यक असल्याने प्रस्ताव सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये नमूद केले नुसार वित्तीय अधिकार प्रदानास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३५ विषय क्रमांक - ७
दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- स्थापत्य क मुख्यालय
सूचक – मा.करुणा चिंचवडे अनुमोदक – मा.साधना मळेकर
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/क-मुख्य/११३/१८ दि.५/५/२०१८
विषय - प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल मधील आय.सी.यु. व ओटी रिनोव्हेशनची उर्वरित कामे करणेबाबत...

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३६ विषय क्रमांक - ८
दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन
सूचक – मा.सारिका लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४/कावि/२४२/२०१८ दि.५/५/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.10/2017-18 अन्वये वृक्षसंवर्धन विभागासाठी वृक्षसंरक्षक लोखंडी पिंजरे खरेदी करणेकामी. मे.डायनामिक सिस्टम निविदा र.रू.24,89,304/- (अक्षरी र.रू.चोवीस लाख एकोणनव्वद हजार तीनशे चार फक्त) या ठेकेदाराची निविदा ही सर्वात कमी दराची निविदा (27.00 टक्के ने कमी) स्विकृत करणेत आली असून, कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक -२६३७ विषय क्रमांक - ९
दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- बी.आर.टी.एस.
सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.विलास मडिगेरी
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/१४८/२०१८ दि.३/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

बोपखेल गावासाठी दापोडी येथून CME हद्दीतून जाणारा रस्ता मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये दि.१३/५/२०१५ रोजी CME द्वारे बंद करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत यापुर्वी सुचविल्याप्रमाणे मुळा नदीवरील पुल ते खडकीतून जाणारा Elphistone Road व्हाया टँक रोड हा रस्ता पक्क्या स्वरुपात करण्याच्या अनुषंगाने या विभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले आहे. दि. २४/६/२०१६ रोजी पिंपरी चिंचवड मनपामार्फत Defence Estate Officer (DEO) यांचेकडे बोपखेल वासियांसाठी मुळा नदीवर स्वरुपातील पुल व पक्का रस्ता बांधणेकामी प्रस्ताव सादर करणेत आला. मनपामार्फत सादर प्रस्तावास अंतिम करणेकामी संरक्षण खात्याचे विविध विभागांचे अधिका-यांचा समावेश असणारे Board of Officers चे दि.८/८/२०१६ रोजी गठण करण्यात आले आहे. या प्रस्तावाचे अनुषंगाने संरक्षण खात्याचे विविध विभाग जसे की, Station Head Quarter (Station H.Q.), Ammination Factory Kirkee (AFK), Defence Estate Officer (DEO), Kirkee Cantonment Board (KCB), Army Base Workshop (ABW) यांचे प्रतिनिधी समवेत वेळोवेळी बैठका झाल्या आहेत. या बैठकादरम्यान संरक्षण खात्याचे विविध विभागामार्फत देण्यात आलेल्या विविध सूचनांचा अंतर्भाव करुन पिंपरी चिंचवड मनपामार्फत दि.०५/१०/२०१६ चे पत्रान्वये अंतिम प्रस्ताव Board of Officers यांचे समोर ठेवण्यात आला आहे.

तसेच महानगरपालिकेमार्फत पत्र क्र.Civil/BRTS/1028/2018 दि.०२/०१/२०१८ अन्वये Station Commandant, ब्रिगेडीयर धिरज मोहन यांना विषयांकित पुलाचे प्रस्तावाचे अनुषंगाने सद्यस्थितीबाबत आढावा बैठक आयोजित करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच पत्र क्र.Civil/BRTS/1027/2018 दि.०२/०१/२०१८ अन्वये, श्री.मनिष ठाकुर (IAS) जॉईंट सेक्रेटरी (Works) केंद्र शासन यांना विषयांकित बोपखेल गावासाठीच्या पुलाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेकामी विनंती केलेली आहे.

उपरोक्त नमुद दिनांक २/१/२०१८ D.O. Letter चे अनुषंगाने राजेंद्र पवार, रक्षा संपदा अधिकारी, पुणे मंडल यांनी त्यांचे दि.४/४/२०१८ चे पत्रान्वये विषयांकित, बोपखेल गावासाठी मुळा नदीवर पूल बांधणे व पोहोच रस्ता बांधणे कामी आवश्यक असलेल्या संरक्षण विभागाच्या जागेची किंमत र.रु.२५,८१,५१,२००/- असलेबाबत कळविले आहे. तसेच उपरोक्त नमुद जागेच्या बदल्यात संरक्षण विभागात कोणती जागा हस्तांतरीत करणार अथवा जागा हस्तांतरण बाबत मनपाचे काय म्हणणे आहे हे कळविण्यास सांगितले आहे.

वरील सर्व बाबींचे अनुषंगाने निर्णय घेताना खालील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

१) बोपखेल गावासाठी बांधावयाच्या पोहोच रस्ता हा मनपा हद्दी बाहेरचा आहे.

२) सदर पूल व रस्ता बांधणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.८९०, दि.२० जुन २०१६ अन्वये र.रु.४२.०० कोटी एवढ्या खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

३) मनपाने दि.५/१०/२०१६ रोजी संरक्षण खात्याकडे सादर केलेल्या अंतिम प्रस्तावात पूल व रस्ता बांधणेसाठी संरक्षण विभागाची आवश्यक जागा विनामोबदला (Free of Cost) मिळावी अशी विनंती केली आहे.

वरील विवेचन विचारात घेऊन, सदरचे प्रस्तावात मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३८ विषय क्रमांक - १०

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- लेखा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/५५१२/१८ दि.८/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत पिंपरी चिंचवड मनपाचे से.क्र.२३ येथील १०० द.ल.ली. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र टप्पा-४ उभारणेचे काम, ठेकेदार मे.आर.बी.कृष्णानी यांनी दि.४/२/२०११ रोजी पुर्ण केलेले आहे. सदरचे काम करीत असताना ठेकेदार मे.आर.बी.कृष्णानी यांनी म.न.पा.कडे अतिरिक्त बाबींसाठी झालेल्या खर्चाच्या रकमेची मागणी केली होती. सदरच्या सर्व मागण्या पाणीपुरवठा विभागाने फेटाळुन लावल्या. तसेच काही मागण्या ठेकेदाराने स्वतः मागे घेतल्या. मे.आर.बी.कृष्णानी यांनी म.न.पा.ने फेटाळलेल्या मागणीच्या विरोधात मे.न्यायालयात म.न.पा. विरुद्ध सेक्शन ८९ खाली दावा दाखल केला. मे.न्यायालयाने या प्रकरणी दिलेल्या आदेशाप्रमाणे श्री.व्ही.आर.कल्याणकर यांची लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली. दिनांक ३०/११/२०१५ पासून लवादाचे प्रक्रियेस सुरुवात झाली असुन प्रकरणी ७ बैठका झाल्या. व श्री.व्ही.आर.कल्याणकर यांनी दिनांक २८/४/२०१७ रोजी या प्रकरणाचा अवार्ड म.न.पा.ला कळविला आहे. त्यानुसार मे.आर.बी.कृष्णानी यांना र.रु.२,१७,९८,०२७/- अधिक दि.४/२/२०११ पासून सदर रकमेवर दरवर्षी १२% सरळ व्याज लावून अदा करणेचे निर्देश दिले आहेत.

उपरोक्त निर्णय म.न.पा. स मान्य नसलेने पाणीपुरवठा विभागाने अवार्ड विरुद्ध मे.न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करुन दरखास्त दाखल केली होती व मे.न्यायालयाने अवार्डवर **Stay** मिळण्याकामी दि.१४/३/२०१८ रोजी अर्ज दाखल केला होता. तथापि, या संदर्भात मे.जिल्हा न्यायालयाने ऍटॅचमेंट वॉरंटचा हुकूम केलेला असून पुढील सुनावणी ६/६/२०१८ रोजी होणार आहे. तत्पुर्वी अवार्डमध्ये नमूद केलेली व्याजासह र.रु.४,०९,८०,२८८/- मे.न्यायालयाकडे जमा करावयाची असून याकामी अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध नाही. अशा प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणांसाठी जमा करावयाच्या रकमांकरीता अंदाजपत्रकामध्ये नवीन

लेखाशिर्ष निर्माण करुन या लेखाशिर्षावर वरीलप्रमाणे रक्कम वर्गीकरण करुन मिळावी अशा प्रस्तावासह शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचेकडून दि.५/५/२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे.

सहशहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचेकडील प्राप्त प्रस्ताव विचारात घेता, याकामी र.रु.४,०९,८०,२८८/- तातडीने उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तरी सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकात कायदा विभागाच्या महसुली खर्चाकडे “न्यायालयीन प्रकरणासाठी जमा करावयाच्या रकमा” हे नवीन लेखाशिर्ष निर्माण करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ प्रकरण ७ (२) (१) अन्वये सदर लेखाशिर्षावर सन २०१८-१९ चे भांडवली खर्चाचे अंदापत्रकातील स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षांतर्गत पानांक १४ अ.क्र.१४ वरील, भक्ती शक्ती चौक येथे ग्रेड सेपरेटर व उड्डाणपुल बांधणे या कामावर केलेल्या ३३ कोटी तरतुदीतुन र.रु.४,१०,००,०००/- (अक्षरी र.रु.चार कोटी दहा लाख रुपये फक्त) तरतुद वर्ग करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६३९ विषय क्रमांक - ११

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- स्थापत्य बीआरटीएस

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सारीका लांडगे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/१५९/२०१८ दि.५/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे देशातील तसेच महाराष्ट्रातील वेगाने वाढणारे शहर आहे. गेल्या २० वर्षात शहरातील लोकसंख्येची वाढ हे दर्शवते.

सन २००१- १०६०४१७ लोकसंख्या

सन २०११- १७२९३५९ लोकसंख्या

सन २०१७- २१००००० लोकसंख्या

त्याअनुषंगाने शहरातील वाढलेले वाहनांचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| साल | दुचाकी वाहने संख्या | चार चाकी वाहने संख्या | इतर वाहने संख्या | एकूण वाहने संख्या |
|---|---|---|---|---|
| सन २००१ | १६४५९८ | २०४८९ | २५४७८ | २१०५५६ |
| सन २०११ | ५३७९२० | ९०३४६ | ७५२१० | ७०३४७६ |
| सन २०१७ | ११६९८३४ | २५४९३३ | १४३८४० | १५६८६०७ |

म्हणजेच २१ लाख लोकांसाठी जवळपास १६ लाख वाहने आहेत व त्यामुळे शहरामध्ये पार्कींगची समस्या जाणवु लागली असल्यामुळे त्यासाठी सर्व समावेशक पार्किंग पॉलिसी करणे गरजेचे आहे.

भारतातील दिल्ली, चेन्नई, पुणे, मुंबई, बेंगलोर, नागपूर या शहारामध्ये स्वत:ची पार्किंग पॉलिसी करून सार्वजनिक पार्कीगच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी दर आकारनी करण्यास सुरवात केली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये पार्किंग पॉलिसी मधील मुख्य बाबी खालील प्रमाणे-

१) पार्किंगचे दर ठरवताना ECS(Equivalent Car Space) हा मुख्य तांत्रिक मुद्दा विचारात घेतला आहे.

| वाहन | ECS |
|---|---|
| दुचाकी | ०.२० |
| रिक्षा | ०.६० |
| चारचाकी | १.०० |
| टेम्पो | १.०० |
| मीनी बस | १.५० |
| ट्रक | २.२० |
| खाजगी बस | ३.९० |

२) शहर हे तीन विभाग (Zone) करणेत आले आहे.

i)Zone A

उच्च पार्किंग मागणी (High Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे जी दिवसभर ८०% ते१००% पार्किंगची आवश्यकता आहे.

ii) Zone B

मध्यम पार्किंग मागणी (Medium DemandParking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ६०% ते८०% आहे.

iii) Zone C

कमी पार्किंग मागणी (Low Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ४०% ते६०% आहे.

iv)Zone D

कमीत कमी पार्किंग मागणी (Lower most Demand Parking)

शहरातील अशी ठिकाणे ज्यामध्ये दिवसभरामध्ये वाहने पार्क करणेचे प्रमाण ४०% पेक्षा कमी आहे.(या झोनसाठी पार्किंग धोरणाची आवश्यकता नाही)

३) पार्किंगचे शुल्क

P= नागरिकांने पार्क केलेल्या भरावयाचे पार्किंग शुल्क

P= (ECS)xRxTxZ

ECS= Equivalent Car Space

R= एका ECS साठी ठरलेला दर

T= वाहन पार्किंग केलेला वेळ

वेळेचे शुल्क हे १ तासासाठी आहेत.

Zone A साठी Z = २.००

Zone B साठी Z= १.५०

Zone C साठी Z= १.००

Zone Dसाठी Z= ०.००

Z= पार्किंग zone नुसार बदलणारा दर

Z=Zone Factor

Zone A/ Zone B/ Zone C/Zone D

४) ज्या रस्त्यांसाठी पार्किंग दर ठरवलेले आहेत त्या रस्त्याच्या लगतच्या सर्व रस्त्यासाठी मुख्य रस्त्यांपासून १०० मी. पर्यत त्या रस्त्यांसाठी पार्किंग पॉलिसी लागू राहणार आहे.

५) रस्त्यावरील पार्किंग साठी पहिल्या रस्त्यांसाठी एका कारसाठी १ ECS साठी र.रू.१० / प्रति तास आकारण्यात येतील त्यानुसार शहरातील पार्किंगचे दर पुढील प्रमाणे असणार आहे.

| वाहन | ECS | Zone A | Zone B | Zone C |
|---|---|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | ४.०० | ३.०० | २.०० |
| रिक्षा | ०.६० | १२.०० | ९.०० | ६.०० |
| चारचाकी | १.०० | २०.०० | १५.०० | १०.०० |
| टेम्पो | १.०० | २०.०० | १५.०० | १०.०० |
| मीनी बस | १.५० | ३०.०० | २२.०० | १५.०० |
| ट्रक | २.२० | ६६.०० | ४८.०० | ३३.०० |
| खाजगी बस | ३.९० | ७८.०० | ५८.०० | ३९.०० |

६) रात्र निवासी पार्कींग साठी रात्री ११ ते सकाळी ८ या ऐके वेळेसाठी (एका ECS साठी) र.रु. २५ प्रति दिनी नुसार र.रू.९,१२५/- प्रती वर्षी वार्षिक परवाना देण्यात येणार आहे.

| वाहन | ECS | Zone A, Zone B, Zone C साठीचे रात्र पार्किंग परवाना दर र.रू.प्रति दिन (रात्री ११ ते सकाळी ८ पर्यंत) | Zone A, Zone B, Zone C साठीचे रात्र पार्किंग परवाना दर र.रू.प्रति वर्षी |
|---|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | ५/- | १८२५/- |
| रिक्षा | ०.६० | १५/- | ५४७५/- |
| चारचाकी | १.०० | २५/- | ९१२५/- |
| टेम्पो | १.०० | २५/- | ९१२५/- |
| मीनी बस | १.५० | ३८/- | १३६८८/- |
| ट्रक | २.२० | ५५/- | २००७५/- |
| खाजगी बस | ३.९० | ९८/- | ३५५८८/- |

७) गावठाण भाग, झोपडपट्टी वस्ती या ठिकाणी सद्या पार्किंग पॉलिसी लागू राहणार नाही परंतू पुढील दोन वर्षांनंतर त्याचा अभ्यास करून आवश्यकतेनुसार योग्य ते धोरण ठरवण्यात येणार आहे.

८) सदरची पार्किंग पॉलिसी सुरु केल्यापासून एक वर्षासांठी सर्व zone साठी zone c प्रमाणे (कमी demand क्षेत्र) पार्कींगचे दर आकारण्यात येतील. एक वर्षानंतर प्रत्यक्ष Parking Demand ची माहिती तयार झाल्यावर शहरातील सर्व मुख्य रस्ते Zone A/ Zone B/ Zone C/Zone D मध्ये विभागण्यात येतील व त्यास प्रसिद्धी देण्यात येणार आहे.त्यामुळे सद्यस्थितीत पार्किंगचे दर खालीलप्रमाणे राहतील.

| वाहन | ECS | Zone A, Zone B, Zone Cसाठीचे दर र.रू.प्रति तास |
|---|---|---|
| दुचाकी | ०.२० | २/- |
| रिक्षा | ०.६० | ६/- |
| चारचाकी | १.०० | १०/- |
| टेम्पो | १.०० | १०/- |
| मीनी बस | १.५० | १५/- |
| ट्रक | २.२० | ३३/- |
| खाजगी बस | ३.९० | ३९/- |

९) या प्रस्तावित पार्किंग पॉलिसीमध्ये येणारे क्षेत्र पुढील प्रमाणे आहे

i) सर्व बीआरटी रस्ते/ पिंपरी (Camp)

ii) भोसरीगाव, नाशिक फाटा उड्डाणपूल, चिंचवड-पिंपरी-कासारवाडी-आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसर

iii) देहू-आळंदी रस्ता/ प्राधिकरण क्षेत्र

iv) भुमकर चौक ते के.एस.बी. चौक रस्ता

१०) खालील वाहन प्रकारांना शुल्कातून सवलत असणार आहे

i) सायकल

ii) रुग्णवाहिका

iii) दिव्यांगांची वाहने

iv) मान्यता प्राप्त रिक्षा थांबे

११) पूर्ण पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये सार्वजनिक वाहनतळ धोरण सुरू करून प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी प्रभागामार्फत प्रत्येक विविधभागासाठी पार्किंग फी जमा करणेसाठी ठेकेदारांची नेमणुक करण्यात येणार आहे.

१२) शहरातील मंजूर विकास आराखड्यातील वाहनतळांची आरक्षणे विकसित करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. त्यानुसार महानगरपालिका जी वाहनतळे विकसित करेल त्या ठिकाणी पार्किंगचे दर नजीकच्या झोनच्या दराच्या २५% कमी ठेवणेत येत आहे.

१३) शहरातील पार्किंगचे शुल्क व पार्कींग करावायाचे रस्ते याबाबत दर दोन वर्षांनी आढावा घेऊन त्यामध्ये योग्य ते बदल करणेत येणार आहे.

सदर पार्किंग पॉलिसीच्या कामासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचावापर कऱण्यात येणार असून Parking App तयार करून पार्किंगचे नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २४३(अ)(१) नुसार सदरचे धोरणास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४० विषय क्रमांक - १२

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- पाणीपुरवठा

सूचक – मा.करुणा चिंचवडे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/१३२९/२०१८ दि.८/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.३१/१०/२०१७-१८ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील पाणी नमुने त्रयस्त संस्थेमार्फत तपासणी करुन घेणे या कामासाठी मे.अनुष्का फुड अँड वॉटर टेस्टींग लॅबोरेटरीज यांची निविदा रक्कम रु.३४,९३,९८०/- पेक्षा ०.००% (अंदाजपत्रकीय) दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३४,९३,९८०/- (अक्षरी रक्कम रुपये चौतीस लाख त्र्यॅण्णव हजार नऊशे ऐंशी फक्त) पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४१ विषय क्रमांक - १३

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग- उद्यान

सूचक – मा.नम्रता लोंढे अनुमोदक – मा.सारीका लांडगे

संदर्भ– मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/२/कावि/२१७/२०१८ दि.५/५/२०१८

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाच्या हद्दीत एकूण १६२ उद्याने आहेत. त्यामुळे उद्यानांमधील खेळणी दुरुस्ती, स्पेअर पार्ट पुरविणे व बसविणेकामी सदरची मान्य रक्कम अपुरी पडत आहे. प्रस्तावात नमुद विषयांकीत कामी नव्याने निविदा प्रसिद्ध करणेकामी कार्यवाही चालू आहे. तथापि दि.१८/४/२०१८ ते दि.२२/४/२०१८ दरम्यान पिंपरी चिंचवड मनपाच्या हद्दीतील काही उद्यानांमधील खेळण्यांचे दुरावस्थेकामी वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध झाली आहे व सन्मा.सदस्य याबाबत वारंवार तक्रार करत असतात. त्यामुळे नादुरुस्त खेळण्यांमुळे पिं.चिं.मनपाचे नाव मलिन होणेस पोषक आहे व अशा खेळण्यांमुळे मुलांनाही दुखापत होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने सदरच्या नादुरुस्त खेळणी दुरुस्ती करणेकामी उद्यान सहाय्यक/उद्यान

निरीक्षक/उद्यान अधिक्षक यांनी अहवाल मागविले असता प्रस्तावासोबत प्रमाणे प्रपत्र “अ” र.रु.६,२९,१८४/- व प्रपत्र “ब” र.रु.३,७०,७७६/- असे एकुण र.रु.९,९९,९६०/- (अक्षरी एकुण र.रु.नऊ लाख नव्याण्णव हजार नऊशे साठ फक्त) खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदर कामास तातडीची आवश्यकता म्हणुन निविदा न मागविता थेट पद्धतीने मुळ निविदेच्या मान्य दराने काम देणेस व खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४२ विषय क्रमांक - १४

दिनांक – ०९/०५/२०१८

सूचक – मा.विकास डोळस अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ– मा.विकास डोळस, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव-

पिंपरी गावातील मनपाच्या यशवंतराव चव्हाण व्यापार संकुलातील कँटीन गाळा ई निविदा क्रं.६/२०१६-१७ अन्वये संबंधित निविदाधारकास वितरीत करणेची प्रक्रिया सध्या सुरु आहे. परंतु सदर प्रकरणी मुळ गाळाधारकाने पुणे येथील न्यायालयात दाद मागितली आहे. न्यायालयाचा निर्णय होईस्तोवर निविदा क्र.६/२०१६-१७ नुसार गाळा वितरणाची कार्यवाही स्थगित करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४३ विषय क्रमांक - १५

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.साधना मळेकर

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/३/कावि/२५९/२०१८ दि.७/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम २००० नुसार घरोघरचा कचरा गोळा करुन मोशी कचरा डेपो येथे वाहतुक करुन टाकणेकामी ब व क प्रभाग कार्यक्षेत्रातील या कामासाठी निविदा नोटीस क्र.५/२०११-१२ देशपातळीवर प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत आलेली होती. मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि. यांची प्राप्त कमी दराची निविदा प्रती टन र.रु.७१४/- स्विकृत करुन मा.स्थायी समिती ठराव क्र.१५४९३ दिनांक २५/१०/२०११ व क्रमांक १६४२१ दिनांक २०/१२/२०११ अन्वये प्रथम वर्षासाठी प्रती टन र.रु.७१४/- व त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी ५% दर वाढीस मान्यता देणेत आलेनुसार त्यांनी दिनांक २९/१२/२०११ रोजी करारनामा सादर केलेला आहे. द्वितीय वर्षासाठी मे.टन दर र.रु.७५०/-, तृतीय वर्षासाठी मे.टन दर र.रु.७८७/- चौथ्या वर्षासाठी मे.टन दर र.रु.८२७/-, पाचव्या वर्षासाठी मे.टन दर र.रु.८६८/- तसेच मुदतवाढ कालावधी दि.०१/०५/२०१७ पासून पुढील कालावधीसाठी ५% दरवाढीनुसार र.रु.९११/- प्रमाणे दरवाढ देण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र.३६० दि.११/०५/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. तदनंतर पुढील मुदतवाढी या र.रु.९११/- प्रमाणे प्रस्तावित करणेत आलेल्या आहेत. तसेच मा.स्थायी समितीकडील ठराव

क्र.२५१५ दि.११/०४/२०१८ अन्वये सदर कामास दि.०१/०४/२०१८ ते दि.३०/०६/२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी सदर कामास दि.०१/०५/२०१८ पासून मागील दर र.रु.९११/- मध्ये मुळ करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार ५% दरवाढ करुन येणारा दर र.रु.९५६.५५/- प्रमाणे मे.बी.व्ही.जी. क्षितीज वेस्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि. यांना देण्यास मा.आयुक्त सो यांनी दि.०७/०५/२०१८ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. तरी दि.०१/०५/२०१८ पासून मागील दर र.रु.९११/- मध्ये मुळ करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पुढील कालावधीकरिता ५% दरवाढीनुसार येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४४ विषय क्रमांक - १६

दिनांक – ०९/०५/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

महापालिकेच्या वतीने शहरातील सर्व नाले सफाईसाठी पावसाळा सुरु होण्यापुर्वी सर्व क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाच्या वतीने ठेकेदार पद्धतीने निविदा काढल्या जातात. आत्तापर्यंतचा पुर्व इतिहास पाहिल्यास पावसाळ्यापुर्वी योग्य ती नाले सफाई वेळेत होत नाही, अश्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होतात. म्हणून या पुढे कायमस्वरुपी, नालेसफाईसाठी निविदा काढू नये. त्याऐवजी या पुढे सर्व नाल्यांची साफसफाई पालिका कर्मचा-यांकडून फटींग च्या माध्यमातुन ०१ एप्रिल ते ३० मे पर्यंत (दरवर्षी) या कालावधी मध्येच करण्यास तसेच याबाबत आवश्यक ती दक्षता व खबरदारी प्रशासन म्हणून सर्व क्षेत्रीय अधिकारी यांनी घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४५ विषय क्रमांक - १७

दिनांक – ०९/०५/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्ते खाजगी संस्था व्यतिरिक्त, मनपाचे विविध विभाग उदा.ड्रेनेज, पाणीपुरवठा, विद्युत इ. विभागामार्फत सुध्दा खोदले जातात. सदरची खोदाई दोन प्रकारे केली जाते.

**अ) विकास कामाअंतर्गत**

**ब) तातडीचे दुरुस्तीचे कामांसाठी**

१) प्रत्येक विभागाने (ड्रेनेज, पाणीपुरवठा व विद्युत इ.) १ एप्रिल ते ३० सप्टेंबर पर्यंत संबंधित स्थापत्य विभागास आगामी आर्थिक वर्षातील (१ एप्रिल ते ३१ मार्च)

विकास कामांतर्गत खोदाई संबंधित प्रभागनिहाय प्रस्ताव नकाशासह पाठविणे आवश्यक आहे.

२) तसेच स्थापत्य विभागाने सुध्दा त्यांचेकडील कोणत्या रस्त्यांचे डांबरीकरण आगामी आर्थिक वर्षात करणे प्रस्तावित केले आहे त्याची माहिती वरील तिनही (ड्रेनेज, पाणीपुरवठा व विद्युत )विभागास प्रभागनिहाय प्रस्ताव नकाशासह पाठविणे आवश्यक आहे.

३) सर्व खात्यांमध्ये समन्वय राहणेसाठी दर महिन्यातील एक तारीख निश्चित करुन मा.शहर अभियंता यांचे अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी. सदर बैठकीत सर्व विभागाचे सह शहर अभियंता बी.आर.टी.एस., विद्युत, पाणीपुरवठा, ड्रेनेज यांनी कार्यकारी अभियंता यांचेसहित हजर रहावे व सदर बैठकीमध्ये खोदाईचे प्रस्तावांना (ठिकाण,लांबी व काम पूर्ण होणेच्या काळाचा त्यामध्ये समावेश असावा.) सदरचे प्राथमिक मान्यता घ्यावी व प्रत्येक बैठकीचा सभावृतांत तयार करावा व अंतिम मान्यतेसाठी मा.आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर करावा. त्यामुळे प्रभागाअंतर्गत खोदाई करणेत येणा-या ठिकाणांची माहिती सर्व विभागांना कळेल व समन्वय राहील.

४) मनपा हद्दीतील ९.०० मीटर व त्यावरील रुंदीचे रस्ते एकदा डांबरीकरण केलेनंतर तीन वर्षे खोदले जाणार नाहीत असे नियोजन असणे आवश्यक आहे या गोष्टीची काळजी व दक्षता पालिकांतर्गत सर्व विभागांनी घ्यावी तसेच वेळोवेळी सर्व विभागांनी एकमेकांशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

५) तसेच परवानगी दिलेले खोदाईचे काम पूर्ण झालेनंतर सर्व संबंधित विभागांनी स्थापत्य विभागास लेखी कळविणे आवश्यक आहे.

६) तसेच ह्यापुढे ड्रेनेज व पाणीपुरवठा विभागाने त्यांनी खोदलेल्या सर्व प्रकारचे ट्रेचेंसची दुरुस्ती (डब्ल्यु.बी.एम. व बी.बी.एम.पर्यंत) स्थापत्य विभागाने करावयाची आहे व त्याकामाचा DLP (Defect Liability Period) एक वर्षाचा ठेवावा.

७) ड्रेनेज, पाणीपुरवठा व विद्युत या विभागांना तातडीचे स्वरुपात देखभाल दुरुस्तीचे काम करण्यासाठी रस्ता खोदावा लागल्यास संबंधितांनी शहर अभियंता किंवा संबंधित कार्यकारी अभियंता स्थापत्य यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

सदरचे धोरणाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत मा.आयुक्त यांनी सर्व विभागास परिपत्रक काढून कळवावे. वरीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४६ विषय क्रमांक - १८

दिनांक – ०९/०५/२०१८

सूचक – मा.विलास मडिगेरी अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ– मा.विलास मडिगेरी, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते विविध सेवा वाहिन्यां टाकण्यासाठी दर वर्षी रस्ते खोदले जातात. सदर रस्ते खोदल्यानंतर ते पूर्ववत दुरुस्ती करणेकामी बराच कालावधी जातो. खोदलेले रस्ते लवकरात लवकर पूर्ववत (दुरुस्ती) करणेकामी धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

**अ) धोरणः-**

१) सेवा वाहिन्यां टाकणा-या संस्थेकडून रस्ते खोदाईसाठी परवानगी मागण्यासाठी करण्यात येणारे अर्ज प्रत्येक वर्षी जुन,जुलै,ऑगस्ट व सप्टेंबर या चार महिन्यामध्येच स्विकारणेत यावेत.

२) महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये अ,ब,क,ड,इ,फ,ग, ह व बीआरटीएस अशा प्रत्येक क्षेत्रियकार्यालय/विभागानुसार सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करावे.

३) रस्ता खोदाईपोटी प्राप्त होणारे शुल्क, त्याच क्षेत्रिय कार्यालयाच्या क्षेत्रातील सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते दुरुस्तीकामी वरील लेखाशिर्षावर देणेत यावे.

४) परवानगी पत्र देणे पुर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत विदयुत विभाग, पाणीपुरवठा विभाग, जलनिःसारण विभाग, वाहतुक विभाग या विभागांचे नाहरकत दाखले प्राप्त करून घेण्यात येऊन, ते शहर अभियंता कार्यालयाकडील तांत्रिक विभागास दिले नंतरच परवानगी पत्र देण्यात यावे.

५) एच डी डी (**Horizontal Direction Drill)** पध्दतीने खोदाईची परवानगी यापुढे कायमस्वरुपी देणेत येऊ नये.

६) परवाना धारक याच्याकडून एकूण खोदाईच्या दुरूस्ती पोटी येणा-या शुल्काच्या २५**%** रक्कम अनामत म्हणून परवानगी देणे पुर्वी डी डी/आर.टी.जी.एस. द्वारे मनपा कोषागारात भरून घ्यावी.

७) या पुढे शहरामध्ये विनापरवाना खोदकाम केल्याचे आढळल्यास/तक्रारी प्राप्त झाल्यास,सदर तक्रार स्थळाचा पंचनामा संबंधित क्षेत्रिय कार्यालय (स्थापत्य) विभागाने करून, खोदाई शुल्काच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कमेचा दंड आकारणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर भागातील उपअभियंता यांनी अनधिकृत खोदाई करणा-यावर **F.I.R.** दाखल करावा.

८) दररोज काम सुरू करणे पुर्वी संबंधित कनिष्ठ अभियंता यांना परवानाधारक संस्था यांनी काम सुरू करणेबाबत कळविणे आवश्यक असून, संबंधित कनिष्ठ अभियंता किंवा स्थापत्य सहाय्यक यांनी दैनंदिन पाहणी करून, कामाचे फोटो व चलचित्र खोदाई काम सुरु करणे अगोदर तसेच खोदाई चालू असताना व बुजविलेनंतर संपुर्ण फोटो व चलचित्र (**Video shooting**) संकलित करून नस्तीबध्द करावेत.

९) फक्त दुरुस्तीसाठी तातडीने रस्ता खोदणे आवश्यक असल्यास, मनपाकडील व खाजगी सेवावाहिन्यांची १०० मीटर पर्यंतचीरस्ते खोदाई शहर अभियंता यांची परवानगी घेवून करणेत यावी व त्यापुढील अंतरासाठी मा.आयुक्त यांची रितसर परवानगी घेण्यात यावी. (सदर तातडीचे कामासाठी **NOC** घेणे व्यतिरिक्त इतर सर्व अटी बंधनकारक राहतील.)

**ब) अटीः-**

**सेवा वाहिन्याचे रस्ते खोदाईचे परवाना देताना खालीलप्रमाणे अटींचा समावेश करावा.**

१) काम करण्याच्या ठिकाणी कामाच्या माहितीबाबत फलक लावणेत येवून त्यामध्ये कामाचे नाव, कामाची मुदत,एजन्सीचे नाव, एकूण रस्ता खोदाई करणेत येणारे अंतर, कामाचे ठिकाण, संबंधित एजन्सीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर व त्या प्रभागातील कनिष्ठ अभियंत्याचे नाव व मोबाईल नंबर इत्यादी माहितीचा समावेश असावा. तसेच फलक प्रत्येक दिवशी काम सुरू होणा-या ठिकाणी ते त्या दिवशीच्या काम पुर्ण होणा-या ठिकाणी तसेच किमान ४०० मी. अंतरावर असावा.

२) काम सुरू करणेपुर्वी संपुर्ण खोदाईचा बार चार्ट परवानगी धारक संस्था यांनी संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांना सादर करावा.

३) वाहतूक पोलीस विभागाकडून परवाना घेणेत येऊन, सदर परवान्याची प्रत संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांच्या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४) खोदाई काम सुरू करणेपुर्वी महाराष्ट्र नॅचरल गॅस (**MNGL**), एम.एस.ई.बी., बी.एस.एन.एल. तसेच एम.आय.डी.सी यांना संबंधित परवाना सादर करून त्याची पोहोच संबंधित कार्यकारी अभियंता स्थापत्य विभागात देणे बंधनकारक राहील. (सदरची बाब त्यांनी त्यांचे सेवा वाहिनीची खोदाई काम चालु असताना दक्षता घेणेसाठी आवश्यक आहे.)

५) ज्या एजन्सीला खोदाई कामाची परवानगी दिली आहे त्यांनी कामाचे फोटो व चलचित्र (Video Shooting) खोदाई काम सुरु करणे अगोदर तसेच खोदाई चालू असताना व बुजविलेनंतर काढणे आवश्यक आहे व त्याच्या प्रती स्थापत्य विभागास काम पूर्ण झालेनंतर सादर करणे बंधनकारक राहील.

६) काम पुर्ण झालेनंतर परवानगी पत्राप्रमाणे काम झाल्याचा, संबंधित स्थापत्य कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेला दाखला, अर्जदार एजन्सीने अनामत रक्कम परतावा अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

७) काम संपल्यानंतर परवाना धारक यांनी अनामत रक्कम परत मिळणेसाठी ४५ दिवसांच्या आतपरवाना देणा-या ठिकाणी अर्ज करणे बंधनकारक राहील. अन्यथा, कोणतीही पुर्व सुचना न देता अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

८) दिलेल्या परवानगी व्यतिरिक्त जादा खोदाई आढळल्यास वाढीव खोदाईस दुप्पट दराने दंड आकारून त्याची वसुली करणेत यावी.

९) सदर रस्ता खोदाईचे काम हे मनपाच्या कार्यालयीन वेळेतच (सकाळी १०.०० ते संध्या ५.४५) पर्यंत करावे.

१०) रस्ता खोदाईची परवानगी देताना मनपा कडून परवानगी पत्रात असणा-या यापुर्वीच्या अटी व शर्ती कायम राहतील.

तसेच ज्या वर्षात सेवावाहिन्या टाकण्यासाठी रस्ता खोदाईची परवानगी दिली जाईल, त्याच वर्षी सदर रस्ते पूर्ववत करण्याचे काम अंदाजपत्रकात ठेवून, पुरेशी तरतुद करुन काम पूर्ण करावे. मा.आयुक्त यांनी सर्व विभागास सदर धोरणानुसार कार्यवाही करणेचे परिपत्रक काढावे. सबब वरीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४७ विषय क्रमांक - १९

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग - पाणीपुरवठा

सूचक – मा.साधना मळेकर अनुमोदक – मा.करुणा चिंचवडे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्यालय/१३३७/२०१८ दि.८/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

इ प्रभागातील भोसरी, इंद्रायणीनगर, पांजरपोळ टाक्यांवरुन पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणे (सन २०१६-१७) चे काम ठेकेदार मे.शुभम उद्योग यांच्या मार्फत चालू असून कामाची मुदत ८ महिने असून सदर कामावर आज पर्यंत फेब्रुवारी अखेर र.रु.३७,३३,२५९/- इतका खर्च झालेला आहे. विषयांकित काम ठेकेदार मे. शुभम उद्योग यांना वरील संदर्भ क्र.६ चे आदेशा अन्वये देणेत आलेले आहेत. सदरचे काम निविदा दरापेक्षा ६.४६% कमी दराने देणेत आलेले असून सदर कामाची मुळ मुदत ८ महिने होती. सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामध्ये मजुर पुरविणेच्या नवीन कामास पुरेशी तरतूद नसल्यामुळे सदरचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करता आली नाही.सद्यस्थितीत इ प्रभागातील भोसरी, इंद्रायणीनगर, पांजरपोळ, टाक्यांवरुन पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणे, (सन २०१६-१७) या

कामाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही काम उपलब्ध नाही, त्यामुळे सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देणेकामी किमान २-३ महिन्याचा कालावधी लागणार आहे.त्यामुळे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी विषयांकित काम पुढे चालु ठेवणे आवश्यक आहे.

सदर कामाची सुधारित निविदा रक्कम रु.३९,९१,९९९/- इतकी असून सदर काम चालु ठेवणेकरिता रक्कम रु. ३१,५०,०००/- वाढीव खर्चाची आवश्यकता आहे. व त्यानुसार होणा-या एकूण खर्चाची रक्कम रु.७१,४१,९९९/- इतकी होत आहे. सदर कामाला मा.महापालिका सभा ठराव दि.२०/०४/२०१८ अन्वये र.रु.८२,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये ठेकेदार यांचेमार्फत प्रस्तुत कामातुन मजुर कर्मचारी पुरविणे योग्य व सोयीचे वाटते.सदर ठेकेदार यांचा प्रस्तुत कामाचा पुर्वानुभव लक्षात घेता विषयांकित वाढीव काम मे.शुभम उद्योग यांचेमार्फत करुन घेणे सोयीचे वाटते. तसेच ठेकेदार यांचा स्विकृत निविदा दर ६.४६%कमी याचा विचार करता संबंधित काम या ठेकेदारामार्फत केले असता, मनपाचे आर्थिक हिताचे होईल, असे मत आहे.सदर कामासाठी सन २०१८-१९ च्या नवीन कामाची निविदा प्रक्रीया या विभागामार्फत अद्याप अंतिम न झाल्याने कामाची आवश्यकता व महत्व लक्षात घेवून मे.शुभम उद्योग यांच्याकडून जुने काम पुढे चालु ठेवण्यात यावे, असे मत आहेव सदर कामाकरिता सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात पान क्र. ७००/२२ या कामाच्या अंदाजपत्रकिय रक्कम व तरतूद आधारे वाढीव खर्चास मान्यता मिळावी. त्यासाठी सुधारित निविदा र.रु.३९,९१,९९९/- च्या अधिक येणा-या वाढीव र.रु.३१,५०,०००/- अशी एकूण रक्कम रु.७१,४१,९९९/- चे खर्चास मान्यता देणेस तसेच यापूर्वी विषयांकित कामाचे सुधारित निविदा र.रु.३९,९१,९९९/- या रकमेस मा.स्थायी समिती ठराव क्र.२२३० दि.२१/०२/२०१८ अन्वये मंजूरी मिळालेली आहे व आता वाढीव सुधारीत र.रु.७१,४१,९९९/- (अक्षरी र.रु.एक्काहत्तर लाख एक्केचाळीस हजार नऊशे नव्याण्णव फक्त) (मुळ सुधारित निविदा र.रु.३९,९१,९९९/- + वाढीव सुधारित र.रु.३१,५०,०००/-) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४८ विषय क्रमांक - २०
दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग - पाणीपुरवठा
सूचक – मा.अर्चना बारणे अनुमोदक – मा.विकास डोळस
संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्यालय/१३३८/२०१८ दि.८/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

इ प्रभागातील मोशी, च-होली, दिघी टाक्यांवरुन पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणे (सन २०१६-१७) चे काम ठेकेदार मे.शुभम उद्योग यांच्या मार्फत चालू असून कामाची मुदत ८ महिने असून सदर कामावर आज पर्यंत फेब्रुवारी अखेर र.रु.३९,४२,७१५/- इतका खर्च झालेला आहे. विषयांकित काम ठेकेदार मे. शुभम उद्योग यांना वरील संदर्भ क्र.6 चे आदेशा अन्वये देणेत आलेले आहेत. सदरचे काम निविदा दरापेक्षा ६.४६% कमी दराने देणेत आलेले असून सदर कामाची मुळ मुदत १२ महिने

होती. सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामध्ये मजुर पुरविणेच्या नवीन कामास पुरेशी तरतूद नसल्यामुळे सदरचे कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करता आली नाही.सद्यस्थितीत इ प्रभागातील भोसरी, इंद्रायणीनगर, पांजरपोळ, टाक्यांवरुन पाणीपुरवठा करणेसाठी मजुर पुरविणे, (सन २०१६-१७) या कामाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही काम उपलब्ध नाही, त्यामुळे सदरचे काम सुरु ठेवणे आवश्यक आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाचे आदेश देणेकामी किमान २-३ महिन्याचा कालावधी लागणार आहे.त्यामुळे पाणीपुरवठा वितरण व्यवस्था सुरळीत राहणेसाठी व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी विषयांकित काम पुढे चालु ठेवणे आवश्यक आहे. सदर कामाची सुधारित निविदा रक्कम रु.५९,८७,९९९/- इतकी असून सदर काम चालु ठेवणेकरिता रक्कम रु.१३,२०,०००/- वाढीव खर्चाची आवश्यकता आहे. व त्यानुसार होणा-या एकूण खर्चाची रक्कम रु.७३,०७,९९९/- इतकी होत आहे. सदर कामाला मा.महापालिका सभा ठराव दि.२०/०४/२०१८ अन्वये र.रु.८५,००,०००/-इतकी प्रशासकीय मान्यता आहे. नवीन कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीमध्ये ठेकेदार यांचेमार्फत प्रस्तुत कामातुन मजुर कर्मचारी पुरविणे योग्य व सोयीचे वाटते.सदर ठेकेदार यांचा प्रस्तुत कामाचा पुर्वानुभव लक्षात घेता विषयांकित वाढीव काम मे.शुभम उद्योग यांचेमार्फत करुन घेणे सोयीचे वाटते. तसेच ठेकेदार यांचा स्विकृत निविदा दर ६.४६% कमी याचा विचार करता संबंधित काम या ठेकेदारामार्फत केले असता, मनपाचे आर्थिक हिताचे होईल, असे मत आहे.सदर कामासाठी सन २०१८-१९ च्या नवीन कामाची निविदा प्रक्रीया या विभागामार्फत अद्याप अंतिम न झाल्याने कामाची आवश्यकता व महत्व लक्षात घेवून मे.शुभम उद्योग यांच्याकडून जुने काम पुढे चालु ठेवण्यात यावे, असे मत आहे व सदर कामाकरिता सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात पान क्र. ७००/२३ या कामाच्या अंदाजपत्रकिय रक्कम व तरतूद आधारे वाढीव खर्चास मान्यता मिळावी. त्यासाठी सुधारित निविदा र.रु.५९,८७,९९९/- च्या अधिक येणा-या वाढीव र.रु.१३,२०,०००/- अशी एकूण रक्कम रु.७३,०७,९९९/- चे खर्चास मान्यता देणेस तसेच यापूर्वी विषयांकित कामाचे सुधारित निविदा र.रु.५९,८७,९९९/- या रकमेस मा.स्थायी समिती ठराव क्र.२२२९ दि.२१/०२/२०१८ अन्वये मंजूरी मिळालेले आहे व आता वाढीव सुधारीत र.रु.७३,०७,९९९/-(अक्षरी रक्कम रुपये त्र्येंहत्तर लाख सात हजार नऊशे नव्याण्णव फक्त) (मुळ सुधारित निविदा र.रु.५९,८७,९९९/- + वाढीव सुधारित र.रु.१३,२०,०००/-) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक -२६४९ विषय क्रमांक - २१

दिनांक – ०९/०५/२०१८ विभाग - पाणीपुरवठा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.सारिका लांडगे

संदर्भ– मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/१३३९/२०१८ दि.९/५/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शेवाळेवाडी ग्रामपंचायत तर्फे सरपंच व इतर अर्जदार विरुद्ध पिंपरी चिंचवड महानगरपालिका या अर्ज नं.३७/२०१६ प्रकरणी राष्ट्रीय हरीत लवाद, पश्चिम विभाग, पुणे यांचे समोर दि.१६/१२/२०१६ रोजी सुनावणी झाली. त्यावेळेस मा.राष्ट्रीय हरीत लवादाने, “शेवाळेवाडी

ग्रामपंचायतीस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १०,००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या दैनंदिन १० टॅंकर ट्रिप्स पुढील आदेश होईपर्यंत पुरविणे" असे आदेश दिले आहेत.

शेवाळेवाडी ग्रामपंचायत हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तसेच पुणे महानगरपालिकेच्याही हद्दीबाहेर आहे. मा.राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशाच्या अनुषंगाने जलक्षेत्र क्र.ड/१३ दापोडी परिसरात टॅंकरद्वारे पाणीपुरवठा करणे या कामांतर्गत शेवाळेवाडीस सद्यस्थितीत ५ टॅंकर पुरविणेचे आहेत. मा.राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशानुसार पुणे महानगरपालिकेलाही २० टॅंकर पुरविणेचे आहेत. सद्यस्थितीत ठेकेदार मे.फ्रेन्डस् वॉटर सप्लायर्स यांचेमार्फत पुणे महानगरपालिकेच्या रामटेकडी येथील फिलींग पॉईंट वरुन पाणी भरुन शेवाळेवाडीस पुरविण्यात येत आहे. शेवाळेवाडी हे गाव पुणे मनपास हडपसरच्या पलीकडे जोडून आहे. रामटेकडी फिलींग पॉईंट ते शेवाळेवाडी ते परत रामटेकडी फिलींग पॉईंट हे अंतर (जाऊन येऊन) सुमारे १४ कि.मी. आहे. या पार्श्वभुमीवर सदरकामी पुणे महानगरपालिकेचे दर वापरणे संयुक्तिक राहिल. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेच्या दरसुचीनुसार पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये व हद्दीबाहरेच्या परिसरात कोणत्याही ठिकाणी १०००० ते १२००० लिटर टॅंकरने पाणीपुरवठा करणेबाबतचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| ०० ते १२ कि.मी. जाणे व येणे | ८८०/- प्रति ट्रिप |
| १२ ते २० कि.मी. जाणे व येणे | ११००/- प्रति ट्रिप |

तरी, पुणे महानगरपालिकेच्या दरसुचीप्रमाणे असलेल्या उपरोक्तप्रमाणेच्या दरांस वापरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(ममता विनायक गायकवाड)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/७/कावि/१६३/२०१८
दिनांक - १०/०५/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(उद्यान/२/कावि/२१७/२०१८ दि.५/५/२०१८ अन्वये विषय क्र.१३ चे लगत)

287

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

उद्यान विभाग

निविदा नोटीस क्र. ०८/२ - २०१३-१४

विषय – मनपाच्या उद्यान विभागाकडील उद्याने तसेच प्राथमिक / माध्यमिक शाळेमधीलखेळणी दुरुस्ती व देखभाल कामाबाबत...

अंतर्गत खेळणी स्पेअरपार्ट पुरविणे व बसविणेबाबत तपशिल

प्रपत्र अ

| अ.क्र. | क्षेत्रिय कार्यालय | बेल्ट | एम.जी.आर सीट /डक | मेरी गो राऊंड बेरींग शाफ्ट | बेरींग असेंब्ली सी.सॉ. | सी. सॉ. शिट | दर एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दर | 4080 | 11880 | 19584 | 2076 | 2280 | |
| १ | अ प्रभाग | 6 | 1 सीट व 2 डक | -- | - | 8 | 72372 |
| | | 24480 | 27372 | | | 20520 | |
| २ | ब क्षेत्रिय कार्यालय | 1 | - | - | - | - | 4080 |
| | | 4080 | | | | | |
| ३ | क क्षेत्रिय कार्यालय | 1 | 1 | 1 | - | 1 | 35544 |
| | | 4080 | 11880 | 19584 | | 2280 | |
| ४ | ड क्षेत्रिय कार्यालय | 6 | 2 | 3 | 4 | - | 140496 |
| | | 24480 | 23760 | 58752 | 8304 | - | |
| ५ | ई क्षेत्रिय कार्यालय | - | - | - | - | - | |
| | | - | | | | | |
| ६ | फ क्षेत्रिय कार्यालय | 1 | 1सीट | 1 | | | 27276 |
| | | 4080 | 3612 | 19584 | | | |
| ७ | ह क्षेत्रिय कार्यालय | 17 | 7 डक व 2 सीट | 3 | 17 | 6 | 267468 |
| | | 69360 | 83160 7224 | 58752 | 35292 | 13680 | |
| ८ | ग क्षेत्रिय कार्यालय | - | 1 सीट | 4 | - | - | 81948 |
| | | | 3612 | 78336 | | | |
| | एकुण | | | | | | 629184 |

प्रपत्र ब

## प्रपत्र ब

288

### जुनी खेळणी दुरुस्त करुन उद्यानांमध्ये बसविणे

| अ.क्र. | खेळणीचा प्रकार | खेळणी संख्या | आवश्यक दुरुस्ती साहित्य | एकुण दुरुस्तीचा दर |
|---|---|---|---|---|
| 1 | सेटे लाईट क्लाईंबर | 3 नग | सपोर्ट लॅडर -01- 16200/- चैन लॅडर- 03- 16200/- पेंटींग- 5400/- बसविणे- 3240/- | 41040/- |
| 2 | फनेलरोप क्लाईंबर | 02 नग | सपोर्ट लॅडर -02-32400/-, लँडिग सपोर्ट – 6- 27072/-, पेंटींग-5400/-,बसविणे- 3240/- | 68112/- |
| 3 | मल्टी सी सॉ | 02 नग | सीट -8- 18240/-, लिव्हर-1- 10920/-,स्टँड – 2- 218490/- पेंटींग-5400/-,बसविणे- 3240/- | 59640/- |
| 4 | एम.जी.आर. एनिमल | 02 | डक -8 -95040/-, पॅडल -4 5280/-, प्लेट -4-2784/- ,बेअरिंग -2 -39168/-, स्टँड -2- 13920/-, आर्म-1-12360/-. पेंटींग-5400/-,बसविणे- 3240/- | 177192/- |
| 5 | डबल आर्च स्विंग | 1 | बेल्ट असेंबली कास्टींग बेअरींग- 2-16800/-, पेंटींग-7992/- | 24792/- |
| | | | | 370776/- |

प्रपत्र "अ" र.रु 629184/- व प्रपत्र "ब" र.रु. 370776/- असे एकुण र.रु. 9,99,960/-

(अक्षरी एकुण र.रु.नऊ लाख नव्वान्नव हजार नवशे साठ फक्त)

अति आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८